क्रमांक : १९३८१ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : २० डिसेंबर, २०२१.

**संदर्भ :-** वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.५२/सेवा-३, दिनांक २२ नोव्हेंबर, २०२१.

## :: परिपत्रक ::

उपरोक्त संदर्भाधिन परिपत्रकान्वये गट-अ, गट-ब, गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड मधील राज्य शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना, त्यांच्या सेवाकाळामध्ये विविध प्रसंगी, त्यांना नियमानुसार अथवा कायद्यानुसार देय व अनुज्ञेय ठरत नसतांना (Excess of their entitlements), शासकीय रकमांचे अतिप्रदान (Excess payment) होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. काही प्रसंगी अतिप्रदान झाल्याचे, भविष्यात आढळून आल्यास, अशा अतिप्रदानाची रक्कम, कर्मचारी शासनास परत करेल, अशा आशयाचे वचनपत्र (Undertaking), संबंधित शासकीय कर्मचाऱ्याकडून घेतले जाणे आवश्यक असतांना काही प्रकरणी वचनपत्र घेतले गेले नाही. अशा अतिप्रदानित रकमेची वसुली सुरू केल्यास कर्मचारी त्यास विरोध करत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. या दृष्टीने भविष्यात वसुल न होऊ शकणाऱ्या अतिप्रदान होणाऱ्या रकमेस पायबंद घालणे गरजेचे आहे. ही बाब विचारात घेता भविष्यात अशी वेतननिश्चिती / वेतनवाढी / अथवा इतर कोणत्याही आर्थिक लाभाच्या / प्रदानाच्या अनुषंगाने अतिप्रदानाची रक्कम लाभधारक, शासनास परत करण्यास बांधील राहील अशा आशयाचे लिखित वचनपत्र (Undertaking) त्यांच्या सेवाकालावधीत एकदाच घेण्यात यावे, जे कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत त्यांच्याबाबत तात्काळ त्यांच्या सेवानिवृत्तीपूर्वी घेण्यात यावे व त्या वचनपत्राची नोंद सेवापुस्तकात घेण्यात यावी. त्याची प्रत सेवापुस्तकात जोडण्यात यावी. सदर कार्यपध्दतीचे पालन करण्याची प्राथमिक जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील, असे कळविले असून वचनपत्राचा नमुना सदर परिपत्रका सोबत जोडला आहे.

सबब, वित्त विभागाच्या परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येणार असून या सचिवालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी सदरचे वचनपत्र पृष्ठ क्र. ३ वरील नमुन्यात शुक्रवार, दिनांक १४ जानेवारी, २०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत "क-१" (आस्थापना) कक्षाकडे सादर करावा.

सदरचे वचनपत्र विहित वेळेस भरुन देणे संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना बंधनकारक आहे. सदरचे वचनपत्र संबंधितांनी विहित कालावधीत न दिल्यास त्यांचे त्यापुढील (विहित कालावधीनंतरचे) वेतन रोखण्याबाबत वित्त विभागाचे दिनांक २२ नोव्हेंबर, २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी. हे वचनपत्र संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्या संपूर्ण सेवा कालावधीकरिता लागू राहील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आदेशानुसार,

**( सुभाष नलावडे )**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद / महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.
६) सर्व समिती प्रमुख यांचे कार्यालय.
७) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.
८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कर्मचारी (सुरक्षा विभागासहित)
९) क-२ (संगणक) कक्ष.
१०) निवडनस्ती.

# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण – २०२१/प्र.क्र.५२/सेवा-३, दिनांक २२.११.२०२१ चे सहपत्र)

## वचनपत्र

मी, श्री. / श्रीमती ......................................................., ..........................

............................................... या कार्यालयात, .................................... या पदावर कार्यरत आहे. मला शासनाकडून कोणत्याही प्रसंगी जसे की, माझी शासनसेवेत नव्याने नियुक्ती होईल तेव्हा किंवा अन्य प्रकारे वेतननिश्चिती / वेतनवाढी / अथवा इतर कोणत्याही आर्थिक लाभाच्या / प्रदानाच्या अनुषंगाने **माझ्या संपूर्ण सेवा कालावधीत,** नियमानुसार अथवा कायद्यानुसार देय व अनुज्ञेय ठरत नसतांना (Excess of entitlements), अतिरिक्त रक्कम प्रदान झाल्याची बाब सद्य:स्थितीत / भविष्यात शासनाच्या निदर्शनास आली / आल्यास, याद्वारे मी असे वचनपत्र देतो / देते की, परिगणनेतील त्रुटीमुळे अथवा कोणत्याही कारणास्तव सदर रकमेमध्ये काही जादा रकमेचे प्रदान केल्याचे सद्य:स्थितीत / भविष्यात, शासनाच्या निदर्शनास आल्यास अशी अतिप्रदानाची रक्कम शासनाच्या समायोजन / रोख स्वरुपात परत करण्यास मी न चुकता बांधील आहे / राहील.

**सही**

**ठिकाण :-** **नाव** ......................................................

**दिनांक :-** **पदनाम**...................................................